# महिला शिक्षण आणि सक्षमीकरण

**अनुराधा रामराव गुजर** संशोधन विद्यार्थिनी समाजशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

Email : anuradhagujr91@gmail.com

---

**गोषवारा** :-

देशाच्या विकासासाठी महिला शिक्षण महत्वाची भूमिका बजावू शकतात. महिला शिक्षण हे परंपरागत भूमिकेतील येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यास सक्षम करते. ग्रामीण भागातील शिक्षणाचा विकास खूप कमी आहे. देशातील अजून हि महिला मोठ्या प्रमाणावर अशिक्षित, मागास, शोषित आहेत. भारतामध्ये मुलींच्या शिक्षणापेक्षा मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. महिलांचे शिक्षण हे समाजातील स्थान आणि कुटुंबातील स्थिती बदलण्याचे साधन आहे. या करिता महिला सक्षमीकारणासाठी शिक्षणाची भूमिका आणि महिला शिक्षणात येणाऱ्या समस्या आणि आव्हाने यांचा अभ्यास या संशोधन लेखात करण्यात आला आहे.

**प्रस्तावना**:-

शिक्षण हे समाजात आणि देशात सामाजिक विकास आणि बदल घडवून आणण्याचे साधन आहे. देशाच्या सर्वांगीण विकासाठी महिलांचे शिक्षण खूप महत्वाची भूमिका बाजवते. शिक्षण हे एक असे साधन आहे. ज्याद्वारे महिलांना नवीन विचार आणि कल्पना आणि आवश्यक कौशल्ये प्रदान करते. शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या सुप्त कलागुणांना बाहेर काढणे किंवा त्यांना त्याची जाणीव करून देणे. शिक्षण हा मानवी हक्क आहे. आणि समानता, विकास आणि शांतता यांचे ध्येय साध्य करण्यासाठी आवश्यक साधन आहे. शिक्षणामुळे महिलांच्या क्षमता विकसित होतात. आणि त्याच सोबतच महिला आणि त्यांच्या कुटुंबाचे आरोग्य, पोषण आणि कल्याण यामध्ये सुधारणा होते. शिक्षण महिलांना विषमतेच्या संस्कृती पासून मुक्त करते. शिक्षण हे लैंगिक असमानता कमी करण्यासाठी आणि निर्णय घेण्यामध्ये सहभागी आणि राष्ट्रीय विकासात योगदान देणारी शक्ती आहे.

समाजात महिलांना सक्षम बनवण्यासाठी शिक्षण हे सर्वात महत्वाचे साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत नाही तर आर्थिक, सामाजिक, सांकृतिक विकसात महत्वाची भूमिका बजावते.

“लोकांना जागृत करण्यासाठी महिलांना जागरूत केले पाहिजे; एकदा ती पुढे सरकली कि कुटुंब पुढे सरकते आणि गाव पुढे सरकते आणि राष्ट्र पुढे सरकते,”— पंडित जवाहरलाल नेहरू.

**उद्दिष्टे** :-

१) महिलांची सामाजिक, आर्थिक स्थिती बळकट करण्यसाठी शिक्षणाची भूमिक अभ्यासणे .

२) महिलांच्या शिक्षणात येणाऱ्या समस्या आणि आव्हाने अभ्यासणे.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधन लेखासाठी दुय्यम स्त्रोत असणाऱ्या साहित्याचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये पुस्तके, संशोधन पेपर, आर्टिकल्स, इंटरनेट इत्यादीचा वापर केला आहे.

**समाजशास्त्रीय सैद्धांतिक दृष्टीकोन**

महिला शिक्षण आणि सक्षमीकरण समजून घेण्यासाठी स्त्रीवादी सिद्धांताचा आधार घेतला आहे. स्त्रीवादी सिद्धांत असे सांगतो कि, लिंग हि एक सामाजिक रचना आहे. पितृसत्ताक नियमांना आव्हान देण्याची आणि शिक्षणासह सर्व क्षेत्रामध्ये महिलांच्या हक्कांसाठी आणि प्रतिनिधित्व यावर भर देते. शैक्षणिक क्षेत्रात महिलांच्या प्रगतीला आणि अडथळयांना दूर करण्याची क्षमता स्त्रीवादी दृष्टीकोनाशी सुसंगत आहे.

**महिला सक्षमीकरण व्याख्या**

सक्षमीकरण हि एक प्रक्रिया आहे. ज्याद्वारे स्त्रीया भौतिक आणि बौद्धिक संसाधनावर अधिक ताबा मिळवतात. ज्यामुळे त्यांचे स्वावलंबन वाढेल आणि त्यांचे स्वतंत्र्य हक्क ठामपणे वाढविता येतील आणि पुरुष प्रधानत्व आणि महिलांवरील लैंगिक आधारित भेदभाव यांच्या विचारसरणीला आव्हान मिळेल. (R.S.Devi & Rajesh Kannan 2008)

**महिला सक्षमीकरण घटक**

- रोजगाराची संधी : उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांना रोजगाराच्या अधिक संधी असतात.
- निर्णय घेण्याची शक्ती : शिक्षित महिलांमध्ये निर्णय घेण्याची शक्ती जास्त असते.

- आर्थिक सहभाग : महिलांचे शिक्षण आणि रोजगार देशाच्या आर्थिकव्यवस्थेत आणि सामाजिक-आर्थिक विकासात योगदान देतात.
- आरोग्य आणि शिक्षणाचे परिणाम : महिला सक्षमीकरण हे मुलांच्या आरोग्य आणि शिक्षणातील सुधारित परिणामांशी संबधित आहे.
- राजकीय सहभाग : महिला शिक्षण सक्षमीकरणामुळे महिलांना राजकीय प्रक्रियामध्ये सहभागी होण्यास आणि सार्वजनिक धोरणांवर प्रभाव पडण्यास मदत होते.

**महिला सक्षमीकरणाचा प्रारंभ व विकास**

महिला सक्षमीकरणाची संकल्पना सर्वप्रथम इ.स. १९६० मध्ये अमेरिकेतील काळ्या जहालवादी गटांनी मांडली. या स्त्रियांनी म्हटले की, आम्ही स्त्री नाहीत का? आम्हाला अधिकार का नाहीत? या विचारांनी महिला सक्षमीकरणाची सुरुवात झाली. १९७५ रोजी खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाला सुरुवात झाली. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. इ.स. १९७५ ते १९८५ हे महिला दशक म्हणून जाहीर झाले. सन १९८५ मध्ये नौरोबी येथील महिला आंतरराष्ट्रीय संमेलन झाले. तेव्हा महिला सक्षमीकरणाची सुरुवात झाली. तेव्हापासून 8 मार्च जगतिक महिला दिन म्हणून पाळण्यास सुरुवात झाली.

भारतामध्ये १९७४ साली मुबईच्या एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाने महिला अभ्यासासाठी संशोधन केंद्राची स्थापना करण्याचे महत्वाचे पाहिले पाऊल उचलले होते. १९८१ साली एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात स्त्री विषयक अभ्यासची पहिली परिषद भरली या परिषदेतून स्त्री अभ्यासाची संकल्पना जन्माला आली. आणि हळूहळू त्याचा विस्तार होत गेला. भारतातील १९८६ च्या धोरणामुळे स्त्री शिक्षणाला गती प्राप्त झाली. तसेच या धोरणात स्त्री शिक्षणाचा सखोल विचार झाला आहे.

**महिला शिक्षणाचे महत्त्व**

देशाच्या विकासाठी महिला शिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. कारण शिक्षित महिला हि तिचे वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनामध्ये व्यवस्थापन करण्यास सक्षम असते. एक शिक्षित महिला हि चांगली आई, नोकरदार, आणि नागरिक होण्यासाठी आवश्यक कौशल्ये, ज्ञान आणि आत्मविश्वास प्रदान करते. अविकसित देशात महिलांना शिक्षित करणे महत्वाचे आहे. कारण शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा मुलभूत अधिकार आहे. समाजात निरक्षरता हि देशाच्या विकासाठी अडथळा होईल. शिक्षण हा प्रत्येक मुलीचा आणि स्त्रियांचा अधिकार आहे. मग ती गरीब असो किंवा श्रीमंत, तरुण असो किंवा वृद्ध, विवाहित, अविवाहित असो किवा विधवा किंवा इतर सामाजिक स्थितीत असेल तरी तिला शिक्षणाचा अधिकार आहे. तसेच महिलांना समान हक्क आणि शिक्षणाची संधी आहे. तेव्हा त्यांना व्यावसायिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये सहभागी होण्याची जास्त संधी मिळू शकते. तसेच कौटुंबिक परिस्थिती बदलण्याची आणि कौटुंबिक गरजा भागवण्यासाठी सक्षम करते. शिक्षित महिलांना स्वतःच्या गरजांसाठी इतरांवर किंवा कुटुंबावर अवलंबून राहण्याची गरज नाही.

**महिला सक्षमीकरणासाठी शिक्षणाची भूमिका**

महिलांच्या सक्षमीकरणात शिक्षणाची भूमिका महत्वाची आहे. परंतु ग्रामीण भागातील महिलांना शिक्षणाचा अधिकार नाकारले जातात. याचे कारण म्हणजे प्रथा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे शिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नाही. शिक्षण मुलीना त्यांचा समाजिक, करिअर, आर्थिक आणि कौटुंबिक जीवनात अधिक सध्या करण्यासाठी सक्षम करते. तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हे एक शक्तिशाली साधन आहे. ज्याद्वारे शिक्षणामुळे नवीन विचार, क्ल्पानाशक्ती, विकसित होते. तसेच आवश्यक कौशल्ये प्रदान करते, त्यामुळे महिलांना शिक्षित करणे म्हणजे संपूर्ण कुटुंबाला शिक्षित करणे होय. शिक्षित महिलांना आर्थिक दृष्टिकोनातून चांगल्या संधी आणि उत्पादिक क्षेत्रात कामामध्ये प्रवेश मिळतो, ज्यामुळे कुटुंबामध्ये महिलांना आर्थिक निर्णयामध्ये सहभागी करून घेतले जाते. शिक्षणामुळे महिलांची स्वतःची स्वप्ने पूर्ण करू शकतात.

शिक्षणामुळे लिंगभेद असमानता कमी करण्याचे एक साधन आहे. ज्यामुळे महिलांना पुरुषांसोबत समानतेचा हक्क मिळतो. शिक्षणामुळे महिलांना त्यांच्या मुलांचे आरोग्य, कल्याण आणि जगण्याची कौशल्ये या संदर्भातील निर्णय घेता येतात. तसेच शैक्षणिक ज्ञानामुळे महिलांना लग्ना संबधित आणि कुटुंब नियोजन संदर्भातील कल्याणकारी निर्णय घेण्यास मदत होते. उदा. एक शिक्षित आई तिच्या मुलांना लसीकरण, चांगली आरोग्य सेवा, प्रजनन दर कमी करणे, बालमृत्यू दर कमी करण्यास, कुटुंबाचे कल्याण करण्यास मदत होते. शिक्षणामुळे महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल समज वाढू शकते तसेच त्यांचा स्वाभिमान वाढू शकतो आणि त्यांना त्यांच्या हक्क संबधित मागणीची संधी मिळू शकते.

शिक्षित महिला या आपल्या कौटुंबिक आर्थिक परिस्थिती बदलू शकतात. शिक्षित महिलांना चांगल्या प्रकारच्या नोकऱ्या मिळू शकतात. ज्यामुळे त्याच्या कुटुंब आणि समुदायाची उन्नती होण्यास मदत होते. शिक्षणाचा फायदा हा देशाच्या आर्थिक विकासाला चालना देतो. ज्या देशामध्ये महिला शिक्षणाचे प्रमाण ज्यास्त असते. त्या देशांमध्ये अर्थव्यवस्था मजबूत असते आणि बेरोजगारीचा दर कमी असतो. शिक्षित महिला अनेकदा त्यांच्या समुदायामध्ये नेतृत्वाची भूमिका घेतात. शिक्षणामुळे एक जागरूक नागरिक निर्माण होतो. ज्याद्वारे त्यांना त्यांच्या हक्कांची आणि कर्तव्याची जाणीव निर्माण होते.

**महिलांच्या शिक्षणात येणाऱ्या समस्या आणि आव्हाने**

गरीबी आणि आर्थिक अडचणी

शिक्षण व्यवस्थेत महिलांना प्रवेश मिळवताना आणि महिलांना शिक्षण घेत असताना अनेक प्रकारच्या अडचणी आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. यामध्ये गरिबी आणि ग्रामीण भागात राहणे किंवा मानसिक कमतरता, लैंगिक प्रवृत्ती यासारख्या घटकांमुळे अनेकदा महिलांना आणि मुलीना शिक्षणाच्या अधिकाराबाबत भेदभाव होत असतो. उदा. 2016 च्या global education monitoring report review (Page NO-19) नुसार २०११ मध्ये भारतात श्रीमंत शहरी मुली आणि मुलांचा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याचा दर सरासरी ७० टक्के होता तर गरीब ग्रामीण पुरुषांसाठी सरासरी २६ टक्के होता परंतु गरीब ग्रामीण महिलांसाठी हा दर खूपच कमी होता. याचा अर्थ असा होतो कि लिंगाच्या आधारित आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातून येण्याचा आणि ग्रामीण भागात राहण्याचा परिणाम होतो.

आर्थिक अडचणीमुळे कुटुंबीय त्यांच्या मुलीना शिक्षण देण्यास प्राधान्य दिले जात नाही. तर मुलांना शिक्षण देण्यास प्राधान्य दिले जाते. यामुळे मुलीना शिक्षण घेण्यास अडथळे येतात. आर्थिक संसाधनाच्या कमतरतेमुळे मुलीना अनेकदा मधूनच शाळा सोडावी लागते. ज्यामुळे त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाढीला अडथळे येतात.

सामाजिक नियम आणि सांस्कृतिक अडथळे

भारताच्या अनेक भागांमध्ये, पारंपारिक लिंग भूमिका आणि सामाजिक अपेक्षा महिलांना शिक्षण घेण्याच्या संधीवर मर्यादा आणतात.

खोलवर रुजलेली सांस्कृतिक रूढी या मुलींना शिक्षण घेण्यापेक्षा लग्नाला प्राधान्य दिले जाते.

**पायाभूत सुविधा आणि सुलभता**

ग्रामीण भागातील अपुरी पायाभूत सुविधा, शाळांचा अभाव आणि अपुऱ्या सुविधांचा मुलींच्या शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो.

वाहतुकीच्या मर्यादित सेवासुविधा आणि सुरक्षिततेच्या चिंतेमुळे मुलींच्या शाळेतील उपस्थितीत घट होते. विशेषतः जेव्हा मुली किशोरावस्थेत येतात तेव्हा शिक्षणातील गळती होत असते.

बालविवाह आणि लवकर पालकत्व

बालविवाहमुळे मुलींच्या शिक्षणावर थेट परिणाम होतो. कमी वयात पालकत्वाच्या जबाबदारी यामुळे शैक्षणिक मार्गात अडथळे आणू शकतात. कारण शिक्षणापेक्षा कौटुंबिक जबाबदाऱ्यांना प्राधान्य दिले जाते.

लिंग- आधारित हिंसाचार आणि छळाचा सामना

शाळेत जाताना आणि शैक्षणिक संस्थामध्ये लिंग-आधारित हिंसाचार आणि छळ सहन करावा लागेल याची भीती अनेक मुलीना शिक्षण घेण्यापासून परावृत्त करते तसेच सुरक्षित आणि सहाय्यक वातावरणाचा अभाव विद्यार्थीनीना शैक्षणिक प्रगतीला बाधा आणते.

**निष्कर्ष**

मुलींचे शिक्षण देशाच्या विकासाठी आणि समाजातील महिलांचे स्थान बदलण्यासाठी शिक्षण हे सर्वात महत्वाचे साधन आहे. तसेच शिक्षणाच्या माध्यमातून स्त्री-पुरुष असमानता कमी होईल. पण भारतातील महिलांना शिक्षण घेण्यासाठी अनेक आव्हानाना सामोरी जावे लागते. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना खोलवर रुजलेली सांस्कृतिक नियम, बालविवाह, संसाधनाचा अभाव आणि सुरक्षितेची चिंता अशा प्रकारच्या अडथळयांना सामोरी जावे लागत असते यामुळे मुली या शिक्षणापासून वंचित होतात. महिलांची शिक्षणात गुंतवणूक करणे हि भविष्यातील गुंतवणूक आहे जी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रगतीची क्षमता विकसित करते. तसेच महिला शिक्षणाद्वारे गरीबी निर्मुलन, चांगले आरोग्य, आर्थिक विकास आणि लिंग समानता केली जावू शकते.

**संदर्भग्रंथ**

1. Dr. S.K. Panneer Selvam (2011) "Empowerment of Women" Publication, Navyug.book International ISBN NO: 978-93-80731-45-2
2. K.Singh (2016) " Importance of Education in Empowerment of Women in India" Journal volume I, ISSN-2456-2831
3. डी.के.कदम (२०००) " उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह, अथर्व पब्लिकेशन्स.
4. https://scoonews.com
5. https://www.pioneershiksha.com
6. https://daanpatra.org
7. https://spectraalwar.org
8. https://www.linkedin.com
9. https://knowindia.india.gov.in
10. https://www.iaws.co.in